# Minor Research Project In Commerce
# Financed By U.G.C.
# Xi-Plan

## “समुद्रपूर तालुक्यातील दारिद्र्य रेषेखालील महिलाच्या आर्थिक व सामाजिक विकासात बचत गटाची भुमिका“


Principal Investigator

Dr. Rajvilas R. Karmore

M. Com., M.Phil., Ph.D.

Co - Researcher

Dr. Rajio G. Kalaskar

M. Com., M.Phil., Ph.D.

Submitted Through

Vidya Vikas Arts, Commerce & Science College

Samundrapur, Dist. Wardha - 42305

R.T.M Nagpur University, Nagpur


2014

# ऋणनिर्देश

"समुद्रपूर तालुक्यातील दारिद्र्य रेषेखालील महिलाच्या आर्थिक व सामाजिक विकासात बचत गटाची भूमिका" हा लघुशोध प्रकल्प २०१०-२०१२ या दोन वर्षाच्या कालावधीत पूर्ण करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने मंजुरी दिली होती. प्रस्तुत लघुशोध प्रकल्प आम्ही यथोचित संदर्भासह पूर्ण केलेला असून विद्यपीठ अनुदान आयोगाला आता सादर करीत आहे.

प्रस्तुत लघुशोध प्रकल्प अष्ट दिशांनी आलेल्या निवडक माहितीचे यथायोग्य संकलन आहे. आमच्या प्रकल्पाला साकार करण्याचे श्रेय अनेकांचे आहे त्यामुळे लघुशोध प्रकल्प सादर करीत असतांना सर्वाकडून प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष लाभलेल्या सहकार्याबद्दल नम्र जाणीवपूर्वक आभार मानणे, आमचे कर्तव्य समजते.

आमच्या महाविद्यालयाच्या प्रेरणास्थान आदरणीय प्राचार्य डॉ.रमेश बोभाटे यांनी आम्हाला हा प्रकल्प पूर्ण करीत असतांना वेळोवेळी जे सहकार्य, प्रोत्साहन व मदत केली, त्याबद्दल आम्ही त्यांची अत्यंत कृतज्ञ आहे.

हा लघुशोध प्रकल्प अहवाल निर्मिती प्रक्रियेत विविध बचत गटातील महिला सदस्य यांची आम्ही आभारी आहे. कारण यांनी आमच्या प्रकल्पाला आवश्यक असणारी सर्व माहिती वेळोवेळी पुरविली व सहकार्य दिले. त्या माहितीच्या आधारे लघुशोध प्रकल्पाची पूर्तता करण्यात आली.

प्रस्तुत लघुशोध प्रकल्प पूर्ण करण्यासाठी मला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर, विद्यापीठामार्फत विद्यापीठ अनुदान आयोगाने जे ९०,००० रूपयांचे अनुदान

मंजूर केले त्याबद्दल आम्ही विद्यापीठाची आणि विद्यापीठ अनुदान आयोगाची अत्यंत आभारी आहे.

विविध वाणिज्य महाविद्यालयातील व आमच्या महाविद्यालयातील ग्रंथालयातील ग्रंथपालांची व पिंपळकर पब्लीकेशन, नागपूर यांनी आम्हाला आवश्यक असणारी पुस्तके अपलब्ध करून दिली व सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांचे आभार व्यक्त करते.

विद्या विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री पांडुरगजी तुळसकर साहेब व संस्थेचे सचिव उमेश तुळसकर साहेब, तसेच महाविद्यालयाातील सहकारी प्राध्यापक, संगणकीय कार्य करणारे, तसेच अनेक अनामिकांचे जे मोलाचे सहकार्य लाभले त्यांचे ऋण व्यक्त करणे हे आम्ही आमचे कर्तव्य समजते.

दिनांक

प्रकल्पकर्ता

प्रा. डॉ. राजविलास कारमोरे

सह-प्रकल्पकर्ता

प्रा. डॉ. राजीव कळसकर

# प्रतिज्ञापत्र

विद्यापीठ अनुदान आयोगाने पत्र क्र. २३-३०२३/११, दिनांक २५ जानेवारी २०१२ नुसार आम्हाला "समुद्रपूर तालुक्यातील दारिद्र्य रेषेखालील महिलाच्या आर्थिक व सामाजिक विकासात बचत गटाची भुमिका' हा लघुशोध २०१२ ते २०१४ या दोन वर्षाच्या कालखंडात पूर्ण करण्यासाठी मंजुरी दिली होती. प्रस्तुत प्रकल्प मी यथोचित संदर्भासह पूर्ण केलेला असून विद्यापीठ अनुदान आयोगाला आता सादर करीत आहे.

दिनांक :-

प्रकल्पकर्ता

प्रा. डॉ. राजविलास कारमोरे

सह-प्रकल्पकर्ता

प्रा. डॉ. राजीव कळसकर

# <u>Contribution to The Society</u>

लघु संशोधनासाठी निवडलेल्या विषय हा समुद्रपूर तालुक्यातील दारिद्र्य रेषेखालील महिलाच्या आर्थिक व सामाजिक विकासात भर टाकणारा आहे. ग्रामीण महिलांनी बचतगटाच्या माध्यमातून चूल व मूल व प्रपंच सांभाळून आपल्या घराला लहान लहान उद्योग–व्यवसायाच्या माध्यमातून दारिद्रयातून बाहेर काढले ऐवढेच नव्हे तर तालुक्यातील पुरूषांनाही त्यांच्या सारख्या उद्योग व्यवसायांना प्रवृत्त केले आहे.

स्वयंसहायता बचतगटाद्वारे महिलांचे आर्थिक सबलीकरण करण्या करीता ग्रमीण व सहकारी बॅकासुध्दा याक्षेत्रात उतरल्या आहेत. महिलांचे आर्थिक सबलीकरण सर्व स्वयंसहायता गटातून सारखेच सबलीकरण होईल असे नाही. कोणत्या प्रक्रीयेतून तो गट निर्माण होतो, सदस्यांचा सहभाग कसा असतो त्यांच्या क्षमता विकास कसा झालेला आहे त्यांची जोडणी कुठल्या संस्थांनी झालेली आहे यावर अवलंबून आहे तसेच सहभागी सदस्यांच्या सामाजिक आर्थिक परिस्थितीप्रमाणे ही प्रकिया वेगळी आहे. स्वयंसहायता गटाची सभासद संस्थेची मर्यादा लक्षात घेता सामुहिक शक्ती आणि समाजसेवेसाठी गटाचा विभाग निर्मितीची गरज आहे. ज्याठिकाणी उद्दिष्टामुळे गट निर्माण करावे लागतात व मर्यादित गटामुळे जे उपलब्ध गट आहेत त्यांनाच बॅकाबरोबर जोडावे लागते तेथे अगोदरच जास्त गटांना प्रवृत्त करता आल्यास निवडीला अधिक सक्षम गट उपलब्ध असतील.

आज देशतील ग्रामीण भागात स्त्रियांना संघटित करण्याची, स्त्रियांच्या सबलीकरणाची स्त्रियांमध्ये जाणीव जागृती निर्माण करण्याची गरज आहे. याकरीता स्वयंसहायता बचत गट हे सशक्त माध्यम म्हणून सिध्द झाले आहे. बचत गटाचे महत्व लक्षात आल्यामुळे केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या विकासात्मक योजनांचा पाया स्वयंसहायता बचतगटावर आधारीत आहे.

## Summary

*प्रस्तुत शोध प्रकल्पामध्ये **"समुद्रपूर तालुक्यातील दारिद्रय रेषेखालील महिलाच्या आर्थिक व सामाजिक विकासात बचत गटाची भुमिका"** या संदर्भातील अध्ययनाचे सार मांडले आहेत.*

*पहिल्या प्रकरणात विषयाची पार्श्वभूमी, स्वंयसहाय्यता बचत गटाचा इतिहास, स्वंयसहाय्यता बचत गट म्हणजे काय?, स्वंयसहाय्यता बचत गटासाठी शासनाचे योजना व फायदे, बचत गटाचे फायदे, स्वंयसहाय बचत व्दारे कर्जाच्या व अनुदानाच्या आधारावर उद्योगाची स्थापना व सक्षमीकरण, भारतातील महिला स्वंयसहायता गटाची भूमिका, केन्द्र शासनाच्या योजना, कार्यक्रम बचट गटांची महाराष्ट्रील चळवळ, महाराष्ट्रील शासनाच्या योजना, इत्यादी माहीती प्रस्तुत करण्यात आली.*

*दुसऱ्या प्रकरणात संबंधीत प्रकाशित किंवा अप्रकाशित साहित्याचा विचार केला आहे तसेच हाती घेतलेल्या संशोधनाच्या विषयावर संबंधीत संशोधनात्मक लेख, अहवाल, प्रबंध इत्यादी प्रकारच्या साहित्यातून पुर्वसंशोधनाचा आढावा घेण्यात आलेला आहे.*

*प्रकरण तिनमध्ये, संशोधन कार्यपद्धती, संशोधनाचे स्त्रोत, विषयाची उदिष्टये, संशोधनाचे कार्यक्षेत्र, संशोधन कार्यक्षेत्र समद्रपूर तालुक्याचे भौगोलिक, सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक पार्श्वभूमी, नमुना आकार व नमुना निवड पद्धती, गृहितके, इत्यादी संबंधित विस्तृत माहिती देण्यात आली.*

*चौथ्या प्रकारणामध्ये महिलांच्या आर्थिक व सामाजिक सक्षमीकरणात बचतगटाची भूमीका उल्लेखनिय आहे. या अनुषंगाने समुद्रपूर तालुक्यातील महिलांच्या सामाजिक व आर्थिक विकासात स्वंयसहायता बचत गटाची भूमिका संबंधीत विश्लेषणात्मक अध्ययन करण्यात आले आहे. त्याकरीता प्राथमिक तथ्य संकलना अंतर्गत प्रश्नावलीच्या माध्यमातू 50 लाभार्थी महिलांची निवड करून*

त्यांच्याकडून विषयाच्या संबंधित माहिती संकलीत करण्यात आली व ती माहिती प्रतीशत प्रमाणे सांख्यीकीय पध्दतीने मांडणी करून निष्कर्ष दिले आहेत.

## Objective of the Project:-

1. महिला बचत गटातील महिलांच्या आर्थिक बाबींचे अध्ययण करणे.
2. महिला बचत गटातिल महिलांच्या आर्थिक प्रगतीमध्ये बचत गटाची भुमीका तपासणे.
3. महिला बचत गटातील महिलांच्या वैयक्तिक आणि कौटुंबिक परिस्थितीचे अध्ययण करणे.
4. महिला बचत गटाद्वारा चालविल्या जाणाऱ्या विविध व्यवसायाचे मुल्यमापण करणे.
5. महिला बचत गटाच्या माध्यमातुन करण्यात येत असणाऱ्या राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक कार्याचा आढावा घेणे.
6. महिला बचत गटाकरीता असलेल्या शासकिय योजनांचा अभ्यास करणे.
7. महिला बचत गटातील महिलांच्या सामाजिक व कौटुंबिक समस्यांची माहिती प्राप्त करणे.
8. महिला बचत गटांना बॅकाद्वारे दिल्या जाणाऱ्या कर्जाचा योग्य उपयोग होतो कायघ ते तपासुन पाहणे.
9. महिनस बचत गटातील महिला समोर निर्माण झालेल्या विविध समस्या व आव्हानांची माहिती प्राप्त करणे.
10. गावपातळीवरील विविध कार्यातील महिलांच्या सक्रिय सहभागाची माहिती प्राप्त करणे.

## Whether objective were achieved: Yes

### *माहितीच्या आधारावर निष्कर्ष व सूचना*

1. *नमुना बचत गटातून अधिकतम 28 महिला हया 30 ते 40 या वयोगटातील आहे आणि कमीत कमी प्रमाण म्हणजे नमुना निवडीच्या फक्त 8 महिला 40 वर्षाच्या पुढे होत्या.*
2. *नमुना बचत गटातून 13 महिलांनी माध्यमिक शिक्षण घेतलेले आढळले तर 3 महिलांना साधे औपचारिक शिक्षण सुध्दा घेतले नसल्याचे दिसून येते.*
3. *नमुना बचत गटातील जास्तीत जास्त महिला हया विवाहित होत्या फक्त 9 महिला ही अविवाहीत होती.*
4. *नमुना बचत गटातून अधिकतम महिला उद्योग व व्यवसाय करणाऱ्या दिसून आल्या त्यानंतर 07 महिला शेती व्यवसाय करणाऱ्या होत्या फक्त 4 महिला घरकाम करणाऱ्या होत्या.*
5. *नमुन बचत गटातील 28 सदस्या विभक्त कुटुंबात असल्याचे दिसून आले यावरून असे निदर्शनास येते की व्यक्ती आपल्या कुटूंबातून विभक्त झाला असल्यास त्याला आर्थिक विकासाचा ध्यास लागतो.*
6. *नमुना गटातील महिलांचे मासिक उत्पन्न सर्वात जास्त 22 कुटुंबाचे 5000 ते 10000 पर्यत 14 कुटुंबाचे उत्पन्न मासीक 10000 च्या वर आढळून आले फार कमी म्हणजे 8 कुटुंबाचे उत्पन्न हे 5000 च्या आत आढळून आले यावरून असे लक्षात येते की, महिलांच्या बचत गटातील सहभागामुळे कुटुंबाला आर्थिक मदत होवून कुटुंबाच्या मासिक उत्पन्न वाढ होत आहे.*
7. *नमुना बचत गटातील महिलांचे सर्वात जास्त म्हणजे 44 कुटुंबाचे स्वतःहाचे घर असल्याचे निदर्शनास आले यावरून असे लक्षात येते की,*

बचत गटाच्या सहभागामुळे कुटुंबाच्या उत्पन्नात वाढ होवून त्या कुटुंबाला स्वतःहाचे घर त्यातील सुखसुविधा सहज उपलब्ध होतात.

8. नमुना निवड बचत गटातील महिला सदस्यांची सर्वसाधारण स्थिती आढळून आली परंतु सदर माहिती देतांना संपत्तीची विचारणा केल्यामुळे टाळाटाळ करीत असल्याचे निदर्शनास आले.
9. नमुना निवड बचत गटातील महिला सदस्यांचे बचत गटातील सहभागामुळे इतर संस्थातील त्यांच्या सहभागाचे प्रमाण काही प्रमाणात वाढतात कारण एकुण 50 सदस्यापैकी 35 महिला सदस्यांनी महिला मंडळात सहभाग असल्याचे त्याचे प्रमाणे 20 सदस्यांनी भजन मंडळात सहभाग असल्याचे दिसून येतो.
10. बचत गटातील सहभागामुळे महिलांच्या सामाजिक सहभागात वाढझाल्यामुळे त्यांचे मित्र, नातेवाईक, शेजारी यांचेशी संबंध चांगले असल्याचे निदर्शनास येते. घेतलेल्य निवड नमुन्यातून 35 महिलांचे चांगले संबंध असल्याचे निदर्शनास आले.
11. महिला बचत गटाच्या सहभागामुळे महिलांचा सामाजिक सण, उत्सव व इतर अंधश्रध्दा, अज्ञान व निरक्षरतेचे निर्मूलन संबंधी कार्यक्रमात मोठया प्रमाणात सहभाग दिसून आला यामुळे त्यांच्या विचारांचे आदाण प्रदान तसेच त्यांच्यात आत्मविश्वास वाढल्याचे दिसून येते.
12. नमुना निवड मधिल महिला सदस्यांना तसेच पदाधिकाऱ्यांकरिता कार्यशाळा, प्रशिक्षण व शिबीर आयोजित केली जातात त्यामध्ये त्यांना बचत गटासंबंधी व कार्यप्रणाली संमधी माहिती दिली जातात त्यामुळे सदस्यांना सुलभ झाल्याचे सदस्यांनी सांगीतले असे निदर्शनास आले.
13. सामाजिक प्रतिष्ठा उंचावणे हि दीर्घकालीन प्रक्रिया असते आणि म्हणून बचत गटातील सहभाग कारणीभूत ठरत असे लक्षात आले कारण 31 महिलांचे साधारण तर 15 महिला सदस्यांचे मध्यम प्रतिष्ठेनुसार वर्गीकरण असल्याचे दिसते.

14. व्यवसायाचे यश ब-या प्रमाणात संबधीताकडून मिळणाऱ्या सहकार्यावर अवलंबून असते प्रस्तुत लघूसंशोधनात असे लक्षात आले की, महिला बचत गटातील महिलांना अधिकतम त्यांच्या महिला बचत गटातील सदस्याकडून जास्तीत जास्त उत्तेजन मिळाले त्या खालोखाल त्यांच्या कुटुंबातील सदस्याकडून अधिक उत्तीजन मिळाल्योच निदर्शनास येते.

15. बाजारपेठ ठरविताना माल विक्रीसाठी मिळणारा प्रतीसाद उत्पादन ठिकाणापासून बाजारपेठेचे अंतर लागणारा खर्च इत्यादी गोष्टी लक्षात घेतल्या जातात आणि त्यामुळे उद्योजक आपल्या सोयी सुविधानुसार बाजारपेठ ठरवितात त्यामुळे नमुना निवछीतील 24 सदस्या स्थानीक बाजार पेठेतच आपला माल विकतात.

16. बचत गटातील कालावधीनुसार वर्गीकरण केले असता असे निदर्शनास आले की, 26 सदस्यांचे स्थापना 3 वर्षापूर्वी ची होती तर 16 सदस्यांच्या बचत गटाची स्थापना 5 वर्षापूर्वी ची होती. कालावधी जास्त बसलेल्या बचत गटातील नमुना निवड महीलांना बचत गट कार्याबद्दल सविस्तर माहीती मिळाली, अनुभव आला. आर्थिक मदत मिळाली व बचत गटाच्या कार्यात त्यांचा सहभाग वाढला.

17. बचत गटातील मासीक बचत गटाची माहिती प्राप्त केली असल्यास असे लक्षात की, अधिक सदस्य 100 रूपये वर्गणी देणार आढळले कमी व 100 पेक्षा जास्त वर्गणी देणारे कमी सदस्य होते. जास्त वर्गणी आल्या बचत गटाची ठेव जास्त वाढते व बचत गट आपल्या सदस्यांना जास्त प्रमाणत कर्जावू रक्कम देवू शकते.

18. बचत गटाच्या बॅकेतील ठेवीचे वर्गीकरण केले असता असे निदर्शनास आले कि, 25000 पर्यंत अधिकतम महीला बचत गटाची जमा रक्क्म होती. 25000 च्या वर त्यापेक्षा कमी बचत गटाची रक्कम होती. सदर रक्कम सदस्यांच्या मासीक जमा रकमेच्या आधारावर अवलबूंन असते. त्याच आधारावर बचत गटाला गरजेनुसार कर्ज पुरवठा करतात.

19. बचत गटातील सहभागामुळे महीलांनी अनुभवलेल्या फायदयानुसार वर्गीकरण केले असता असे निदर्शनास आले की, अधिकतम महीलांना बचतीची सवय लागली त्याखालोखाल आत्मविश्वास वाढला, स्वात्त्र मिळाले,सामाजीक प्रतीष्ठा वाढली, कुटुंबात मान मिळालना. घरगुती अडचणी भागविणे शक्य झाले. एकूणच बचत गटातील सहभागामुळे बचत गटातील महिलांचे वैयक्तिक व सामाजीक व आर्थिक सक्षमिकरण अश्या प्रकारचे फायदे होतात.

20. बचत गटातील सदस्य व बचत गट त्यांच्या उद्योग व्यवसायाची माहीती प्राप्त केली असता जास्तीत जास्त सदस्य गृह उद्योग व शिवणकाम, जनरल स्टोअर्स, दुग्धव्यवसाय, शेती व शेतीपूरक व्यवसाय अशा प्रकारचे व्यवसाय करतात.

21. बचत गटातील महीला सदस्य वैयक्तीकरित्या तथा सामुहीक व सहकारी तत्वावर परीश्रमपूर्वक कार्यरत असल्यामुळे त्यांना मासिक उत्पन्नातून खर्च वजा जास्त नफा झाल्याचे दिसले.

22. बचत गटातील महीला सदस्यांना त्यांच्या उद्योग व्यवसायामुळै त्यांना घरगुती अडचणी पूर्ण करता आल्या, त्याच प्रमाणे त्यांना घेतलेल्या कर्जाची परतफेड करता आली, कुटूबांचे स्वास्थ टिकविता आले, सण इतर सार्वजनिक कार्य व इतर कार्य पूर्ण कराय आले. त्याचप्रमाणे व्यवसायात पैसा गुतंवून व्यवसायात वाढ करता आली.

याही व्यतिरीक्त खालील निरनिराळे अनेक फायदे दिसून आले.

अ) सामुहिक कार्यप्रणालीत नेतृत्व निर्माण होते.

ब) पाहिजे तेव्हा कर्ज मिळत असल्यामुळे आर्थिक ताण कमी होतो.

क) काटकसरीची व बचतीची सवय लागते.

ड) इतर सावकाराकडून कर्ज घेणे बंद होते.

इ) आर्थिक व्यवहारासंबंधी शिस्त लागते.

फ) बॅकेचे व्यवहार माहीत होते, बॅकेच्या व्यवहाराची सवय लागते.

ग) सामाजिक संस्था, सामाजिक कार्य यात सहभाग वाढतो व मानाचे स्थान प्राप्त होते.

ह) व्यावहारीकतेचे ज्ञान प्राप्त होते.

च) कौटुंबीक व सामाजिक प्रतिष्ठा वाढते.

ज) मुले शिकण्याकरीता हातभार लागतो व कौटुंबीक आर्थिक प्रगती साध्य होते.

23. महिला बचत गटातील सदस्य बचत गटाच्या कार्यप्रणालीत समाधानी असल्याचे लक्षात येते.

24. बचत गट अस्तित्वात आल्यापासून ग्रामीण महिलांना त्यांच्या आर्थिक विकासासाठी एक दालन निर्माण झाले आहे. बचत गटातील नियीमत मासिक वर्गणी गोळा केल्यानंतर बॅकेतील भरणा वाढतो व त्या आधारे सदस्यांना कर्ज प्राप्त होते पर्यायाने कर्ज मिळताना त्यांना येणाऱ्या अडचणी नमुद करता येईल.

अ) कर्ज प्राप्तीसाठी आवश्यक माहितीचा अभाव जानवतो.

ब) कर्ज प्राप्तीसाठी विलंब लागतो.

क) मागणी एवढी कर्जाची रक्कम मिळत नाही.

सूचना

1. बॅकाकडून बचतगटाच्या माध्यमातून नमुना निवड महिलांना इच्छित उद्योग–व्यवसाय करण्यासाठी अनेक तांत्रिक अडचणी येतात.त्या येऊ नयेत म्हणून व्यवसाय तज्ञाकडून त्यांना तात्रिक मार्गदर्शन मिळावे.
2. प्रस्तुत लघू संशोधनातील प्राप्त परिणामावरून प्रतिवेदल महिलांना बॅकेकडून कर्ज प्राप्ती होण्यासाठी पूर्ण करावयाच्या औपचारिकतेबद्दल व्यवस्थित माहिती नसते. त्यामुळे त्यांना अर्ज सादर करण्यासाठी वेळ लागतो. त्यामुळे अर्ज छाननी

व कर्ज मंजुरीसाठी विलंब होतो. हे टाळण्यासाठी बॅकेच्या वतीने (Orientation) आयोजित करण्यात यावे.

3. नमुना निवड महिलांनी दिलेल्या माहिती नुसार कर्ज मंजुरी नंतर त्यांना कर्जाची रक्कम एकदम मिळत नाही. ती एकावेळेस मिळण्याची व्यवस्था बॅकेकडून व्हावी. त्याचप्रमाणे प्रचलित व्याजाचा दर जास्त वाटतो तो कमी करण्यात यावा.
4. बचत गटातील नमुना निवड महिला त्यांनी अंगिकारलेल्या उद्योग–व्यवसायातून उत्पादित केलेला माल विकण्यासाठी नेहमी अडचण येतात. त्यासाठी त्यांचा उत्पादित माल विक्रीसाठी सहकारी तत्वावर मदत मिळावी.
5. बचतगटातील महिलांना बचतगट कार्यप्रणाली नियम व्यवसाय–उद्योग याविषयी वेळोवेळी कार्यशाळा परिसंवाद,व्याख्याने आयोजित करण्यात यावे. तसेच वर्तमान पत्रातून त्याबद्दल माहितीप्रसारीत करावी.
6. विदर्भ विभागातील बचतगटांच्या तुलनेत पश्चिम महाराष्ट्रातील मुख्यत्वे कोल्हापूर,सातारा तथा पुणे जिल्हयातील बचतगटांची आर्थिक व सामाजिक प्रगती विशेष केलेली दिसते. या भागातील बचतगटातील महिलांना त्या ठिकाणी सहलीद्वारे घेवून ते दाखविण्यात यावे.
7. बचतगट कार्यप्रणालीत बचतगट महिलांच्या कुटुंबप्रमुख तथा इतर सभासदांनी आवश्यक ते सहकार्य करावे.
8. विदर्भातील बचतगटातील महिलांनी सामान्य स्वरूपांच्या उद्योग–व्यवसायाचा अवलंब केल्याचे दिसते. काही नाविन्यपूर्ण जास्त आर्थिक मिळकत मिळवून देणारे उद्योगांचे अवलंबन करणे गरजेचे आहेत्र उदा. सिमेंटचे लहान लहान उत्पादने, रासायनिक खते, कृषि सेवा केन्द्र इत्यादी.
9. करण्यात येणारे अर्थाजन केवळ स्व–विकासाकरिता नसुन कुटुंबाचा सभासद म्हणून इतर सभासद हि त्यांचे हिस्सेदार असतात. हा विचार स्त्रियांमध्ये दृढमल व्हायला हवा.
10. बचतगट महिलांना आपल्या उद्योग व्यवसायाच्या विकासासाठी कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध करून द्यावे.

11. बचतगटाच्या महिलांनी व्यवसायातून किंवा उद्योगातून तयार केलेल्या मालाला शासनांनी प्रदर्शनी भरविण्याची व बाजारपेठेची सोय उपलब्ध करून द्यावी.
12. बचत गटातील महिलांना उद्योग सुरू करण्यासाठी उद्योगाबाबतचे प्रशिक्षण व कार्यशाळा ग्रामीण स्तरावर शासनाने सुरू करावे.
13. स्त्रीयांचा सामाजिक, आर्थिक व राजकीय सबलीकरणाचा मार्ग सुकर होण्यासाठी शासनाने स्त्रीयांसाठी पारीत करण्यात आलेले कायदे व शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या अनेक योजना यासंबधीची माहिती ग्रामीण भागातील किंवा बचत गटातील स्त्रीयांपर्यत पोहचविण्याची व्यवस्था स्वंयसेवकाद्वारे करावी.
14. बचतगटातील महिलांनी आपल्या मिळकतीचा वापर भौतिक सुख सुविधेकरीता न करता त्यांनी मुलांच्या शैक्षणिक व आरोग्य विषयक गरजांच्या पूर्तीकरीता करावा.
15. ग्रामीण भागात राहणाऱ्या स्त्रीयासाठी महत्वाची सूचना म्हणजे शिक्षण, ज्ञान व अर्थाजन यामुळे स्त्रीयांचे सबलीकरण होत आहे. या साधनांचा वैयक्तिक, कौटुंबिक व सामाजिक जीवनात योग्य उपयोग करावा.
16. प्रथमतः बचत गट स्थापन करण्याकरिता महिलांना बॅक अधिकारी, कर्मचारी यांनी इंतभूत माहिती सविस्तर समजुन सांगावी. जेणेकरून महिलांची फसवणुक होणार नाही.
17. स्त्रीयांनी परंपरागत बचतीचा मार्ग न अवलंबीता शासन पुरस्कृत संस्थाच्या माध्यमातून बचत करावी त्यामुळे त्यांची आर्थिक फसवणुक होणार नाही.
18. बॅक अधिकारी व बॅक कर्मचारी यांनी दर सहा महिन्यांनी प्रत्येक बचत गटांन भेटी द्याव्या व त्यांच्या काही अडचणी असल्यास त्या सोडवाव्या.
19. बचत गटातील महिलांना उद्योग व्यवसाय सुरू करण्यासाठी शासनानी कच्या मालाची उपलब्धता करून द्यावी.